MA II- Marathi-Paper 8 दलित साहित्य

TYPE : MCQ

Q1. संपूर्ण दलित कविता खालीलपैकी कशाकशाची ऐतिहासिक मूल्य असलेली गाथाच आहे?

1. सामाजिक स्तरावरील अत्याचार
2. अन्याय
3. विटंबना
4. वरील सर्व

Q2. भारतात अस्तित्वात असलेल्या वैचारिकतेला, विचार व्यवस्थेला कोणी आव्हान दिले?

1. महात्मा फुले
2. डॉ बाबासाहेब आंबेडकर
3. नामदेव ढसाळ
4. महात्मा गांधी

Q3. दलित आत्मकथनाची निर्मिती यातून झाली आहे?

1. दुःखभोगातून
2. असहाय्यतेतून
3. आनंदातून
4. 1 व 2 यातून

Q4. ‘वाट तुडवताना’ या आत्मकथनाचे मर्म काय आहे?

1. परावलंबी होणे
2. स्वतःच स्वतःची वाट होणे
3. परिक्रमणा करणे
4. यापैकी नाही

Q5. आत्मचरित्र मध्ये कशाला अधिक महत्त्व असते?

1. सत्य
2. प्रामाणिकपणा
3. वस्तुनिष्ठता
4. यापैकी सर्व

Q6. 'निब्बाण' या नाटकाची भाषा कशी आहे?

1. नागरी समाजाची प्रमाण मराठी
2. ग्रामीण
3. मालवणी
4. यापैकी नाही

Q7. 'निब्बाण' या नाटकामध्ये लेखकाने कोणत्या सीमा ओलांडून वैश्विक पातळीवरील मानवी समाजाच्या जगण्याचे चिंतन केले आहे?

1. प्रदेश
2. राज्य
3. देश
4. यापैकी सर्व

Q8. 'शूद्र' कादंबरीतील काळ कोणता आहे?

1. अश्मयुगीन
2. मध्ययुगीन
3. प्राचीनतम
4. आधुनिक

Q9. ‘परिव्राजक’ म्हणजे काय?

1. स्वगृह , आप्त यांचा त्याग करणारा
2. सर्व मोह बंधाचा त्याग करणारा
3. बहुजन हितासाठी धम्म प्रसार करणारा व्यक्ती
4. वरील सर्व

Q10. ‘सायरनचे शहर’ हा कवितासंग्रह म्हणजे माणसाच्या कशा प्रकारच्या मनस्थितीचा कवितांचा जमाव आहे?

1. दंगलखोर
2. युद्धखोर
3. भयावह
4. वरील सर्व